
# प्रकाश प्रवहन

भाग १ अंक ८ | द्वै–मासिक पत्रिका | नोव्हेंबर–डिसेंबर २०२४



### गुरुजी कृष्णानंद (१९३९–२०१२)

### प्रकाश

प्रकाश, हा भौतिक प्रकाश नसून सूक्ष्म पातळीवरचा प्रकाश आहे, जो सर्व निर्मितीचा स्त्रोत आहे. प्रेम, शांती, सत्य, बुद्धी आणि सर्व जीवनाचा तो स्त्रोत आहे. हा प्रकाश म्हणजेच देव.

### प्रवहन

म्हणजे प्रकाशाला हेतूपुर्वक आपल्या शरीरात येण्याची अनुमती देऊन त्यानंतर पूर्ण जगात त्याला पसरविणे. आपले शरीर प्रकाशाला स्थूल पातळीत बदलते. ही प्रकाशाची कंपनं, सर्व प्राणिमात्र आणि निसर्गात पोहोचतात. त्यात प्रेम, शांती, सकारात्मकता आणि हीलिंग अशा वेगवेगळ्या शक्ती असतात, त्या परिवर्तनासाठी मदत करतात. माणसं अजून चांगली होतील आणि हे जग, एक अजून चांगली जागा असेल.

### तंत्र

तुमच्यावर प्रकाशाचा महासागर आहे अशी कल्पना करा. आता हा प्रकाश खाली येऊन तुमच्या पूर्ण शरीरात भरतो आहे अशी कल्पना करा. आता प्रेम, प्रकाश आणि शांती ह्याचा एक मिनीटभर अनुभव घ्या. आता कल्पना करा की हा प्रकाश हळूहळू तुमच्या शाळेत, परिसरात, राज्यात, देशात आणि मग संपूर्ण जगात पसरतो आहे.

ह्याचा कमीतकमी ७ मिनीटे सराव करा.

### प्रकाश प्रवहन जागतिक चळवळ

गुरुजी कृष्णानंद, संस्थापक सप्तर्षी मार्ग, ह्यांनी १८ मे २००८ रोजी ह्या चळवळीची सुरुवात केली. ही चळवळ म्हणजे, रोज कमीतकमी ७ मिनिटांसाठी, झोपेतून उठल्यानंतर आणि झोपण्यापुर्वी, आपापल्या घरातून प्रकाश प्रवहन करणे. ह्या चळवळीचा मुख्य उद्देश, पृथ्वीवर शांतता नांदावी, हा आहे.

### चळवळीची खास वैशिष्ट्ये

- प्रकाशाने एकात्मता
- धर्मनिरपेक्ष, जागतिक
- कुठलेही नियम आणि अटी नाहीत
- कुठलेही सदस्यत्व नाही
- प्रत्येकजण शांततेसाठी योगदान देऊ शकतो
- वैयक्तिक आणि जागतिक मदत
- आपल्याला आणि जगाला नवीन युगात प्रवेश करण्यास मदत करते.

## संदेश

### गुरुजी कृष्णानंद

(गुरुजींच्या १८ सप्टेंबर २०११ या दिवशीच्या भाषणातील काही वेचे)

अनुवाद: मेधा कुलकर्णी

**साधना म्हणजे काय ?**

आपण प्रकाशकण आहोत, प्रकाशाचाच भाग आहोत, जो स्वत: देव आहे, याची जाणीव असणे म्हणजे साधना होय.

सर्व प्रकारचे पूर्वग्रह, अंधश्रद्धा, असत्य कल्पना आणि बंधने यांचा निचरा होऊ देणे म्हणजे साधना होय. सर्वसामान्यतेच्या पलीकडे जाणे म्हणजे साधना होय. सत्याचा विपर्यास होत असेल, तर ते ओळखणे आणि त्याच्या पलीकडे जाणे म्हणजे साधना होय. चिरंतन सत्य समजण्यासाठी आपल्याला आपली आंतरिक शक्ती (intuition) विकसित करावी लागेल आणि जास्त काळ गूढ क्षेत्रात घालवावा लागेल आणि उच्चतर अनुभव घ्यावे लागतील.

साधना म्हणजे आपल्या अवतीभोवती सर्वत्र असलेल्या परमेश्वराच्या अस्तित्वाची जाणीव असणे होय.

दररोजच्या जगण्याची जी सर्वसामान्य पातळी असते, त्याच्याही वर जाणे म्हणजे साधना होय. अर्थात् रोजच्या घडामोडींवर लक्ष देणे महत्त्वाचे आहे, पण त्या सर्व घडामोडी प्रत्यक्ष आयुष्याइतक्या महत्त्वाच्या नाहीत. आपल्या खऱ्याखुऱ्या गुरुचा म्हणजेच प्रत्यक्ष परमेश्वराचा शोध घेणे म्हणजे सुद्धा साधना होय.

साधनेत आणखी टप्पे आहेत.

## संस्मरणीय घटना

जयंत देशपांडे, अनुवाद : वैशाली जोशी

प्रकाश प्रवहन करणारी एखादी व्यक्ती जेव्हा म्हणते की ह्या सरावामुळे तिला तिचा गंभीर आजार स्वीकारण्यास आणि त्याला सकारात्मकतेने सामोरे जाण्यास मदत झाली आहे, तेव्हा मला खूप नम्र आणि कृतज्ञ वाटते की आम्ही प्रकाश प्रवहनाच्या चळवळीचा प्रसार करण्यात अगदी लहान प्रमाणात का होईना सहभागी आहोत. आम्ही लोकांना प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव करून देतो आणि प्रकाश प्रवहनाचे साधे तंत्र त्यांना शिकवतो, ज्यामुळे प्रकाशाशी थेट जोडण्यास त्यांना मदत होते. आमची भूमिका इथे संपते.

प्रकाशाशी अशा प्रकारे जोडल्याने लोकांच्या जीवनावर जो प्रभाव पडतो तो खूप महत्त्वाचा आहे. त्यांच्या जीवनात येणाऱ्या कोणत्याही आव्हानांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य आणि विवेक त्यांना मिळतो.

## प्रकाश प्रवहनाचे कार्य

मनोज चोप्रा, अनुवाद: मेधा कुलकर्णी

अलिकडेच, गेल्या दोन वर्षांपासून नियमितपणे प्रकाश प्रवहनाचा सराव करणाऱ्या एका प्रसिद्ध संस्थेकडून आम्हाला आभार व्यक्त करणारे पत्र आले. तेथील प्राचार्यांच्या लक्षात आले आहे की विद्यार्थी सभांमध्ये जेव्हापासून ध्यानप्रक्रियेचा अंतर्भाव करण्यात आला, तेव्हापासून विद्यार्थ्यांमध्ये बदल घडून आला आहे. विद्यार्थी शांत, समंजस आणि वर्गामध्ये अधिक लक्ष देणारे झाले आहेत. शिक्षकसुद्धा आपल्यामध्ये एक विधायक बदल घडून येत असल्याचा अनुभव घेत आहेत कारण त्यांच्या अत्यंत व्यस्त आणि व्यग्र दिनक्रमात प्रकाश प्रवहनाच्या सरावामुळे एक शांतपणा, संयमितपणा आला आहे. या सरावानंतर त्यांना आराम वाटतो आणि ते अधिक समाधानी, आनंदी होतात.

शाळा व्यवस्थापनाने प्रकाश प्रवहन सरावावर पूर्णपणे विश्वास ठेवला आणि तो सराव गांभीर्याने घेतला, यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत. मला जाणीव आहे की अशा प्रकारचे शेकडो अभिप्राय देशाच्या अनेक भागातून आले आहेत आणि ते आम्हाला प्रेरणा देतात. ते आम्हाला आम्ही योग्य मार्गावर आहोत याची आणि प्रकाश आम्हाला मार्गदर्शन करत आहे, याची खात्री पटवून देतात.

## ऋषींची अनमोल वचनं

**अनुवादः भुवन दिवेकर**

- प्रत्येक मनुष्य हा सर्व प्रकारच्या भावना अनुभवायला सक्षम आहे. पण भावना व्यक्त करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. काहीजण आक्रमकपणे भावना व्यक्त करतात तर काहींच्या भावना हळुवार आणि जास्त तरल असतात.
- कला, संगीत, कविता, स्वप्नं ई. सर्जनशील क्रियांच्या मागे जीवन–शक्ती असते. जीवन–शक्ती ही मुबलक प्रमाणात सर्वत्र उपलब्ध आहे. निसर्गात राहून, आकाशाकडे बघून आणि प्रकाशाचा अनुभव घेऊन आपण ही जीवन–शक्ती आपल्यात शोषून घेऊ शकतो.
- चमत्काराच्या अपेक्षेने ध्यान करणे, ही एक सामान्य प्रवृत्ती आहे. तसं होत नाही. आपल्याला ध्यानासोबत प्रयत्नसुद्धा करावे लागतात. जेव्हा आपण ध्यान करतो, तेव्हा आपण आनंदाच्या स्थितीत असतो, शांत असतो किंवा विश्रांतीच्या अवस्थेत असतो.
- एकदा का तुम्ही स्वत:ला प्रकाशाला अर्पण केलेत, की तुम्ही काहीही मागण्याची गरज राहात नाही. जरी तुम्ही प्रकाशाचे माध्यम बनला नाहीत, तरीही तुम्ही कशासाठीही प्रार्थना करण्याची गरज नाही कारण आपल्याला कशाची गरज आहे हे देवाला माहीत असते. आपण आपल्या स्वत:च्या समाधानासाठी प्रार्थना करतो आणि त्यात काहीही चुकीचे नाही.
- विशेष स्वारस्य न घेतल्यास, आपण फक्त लहान गोष्टी साध्य करू शकतो. काहीतरी मोठं साध्य करण्यासाठी उत्कट इच्छा असणे आवश्यक आहे.
- पृथ्वीवरील ध्यानसाधकांवर एक खास जबाबदारी आहे. ध्यानसाधकांमार्फत नवीन ऊर्जा पसरवल्या जात आहेत आणि नवयुगाची स्थापना होणार आहे. त्यांच्या कळत–नकळत, स्वत:चं आणि मनुष्यजातीचं भवितव्य ठरवण्याच्या कार्यात त्यांचं खास योगदान आहे. नवीन युगाची स्थापना करणं हे सुद्धा एक आध्यात्मिक ध्येय आहे.
- इतरांमधल्या चुका शोधण्याच्या सवयीला आळा घालण्यासाठी आपण इतरांना दोषी म्हणून बघणं थांबवलं पाहिजे. अगदीच गंभीर गुन्ह्यांच्या बाबतीत जिथे आपण इतरांना आरोपी म्हणून बघणं थांबवू शकत नाही, जसं की बलात्कार, खून, आतंकवाद ई., अशी कृत्ये आपण माफ करू शकत नाही. अशा कृत्यांची आपण पारख केली पाहिजे आणि त्यांना मानसिकदृष्ट्या नाकारले पाहिजे.
- आपल्याला हे माहिती असायलाच हवं की आपलं सगळं ध्यान आणि साधना हे आपल्या बदललेल्या विचार, भावना आणि वर्तणुकीत दिसून आलं पाहिजे.
- धर्म हा आपला मूळ स्वभाव आहे. आपला मूळ स्वभाव म्हणजे प्रेम, शांतता, प्रामाणिकपणा, करूणा आणि सर्व सकारात्मकता. आपण आपल्या मूळ स्वभावाचे प्रकटीकरण करणे आवश्यक आहे.

**–गुरुजी कृष्णानंद**



सप्टेंबर १८, २०२४ रोजी इंदिरानगर, बंगलोर येथे एका शाळेत प्रकाश प्रवहनाचे सत्र आयोजित केले गेले.



चिक्कगुब्बी, बंगलोर येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयात २१ सप्टेंबर, २०२४ रोजी शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी प्रकाश प्रवहन केले.



सप्टेंबर २६, २०२४ रोजी कर्नाटकमधील उडुपी येथे एका शाळेच्या शिक्षकांसाठी प्रकाश प्रवहन सत्र आयोजित केले गेले.

# जीवन–शक्ती

मनोज चोप्रा, अनुवाद : भुवन दिवेकर

अचानक पावसाची सर आल्यावर, आकाशात इंद्रधनुष्य बघून किंवा एखादं फुलपाखरू आजुबाजूला बागडत असताना एखाद्या लहान मुलाला आनंदाने उड्या मारताना तुम्ही कधी पाहिलं आहे का? एखादा तंबू बांधताना किंवा एखादा मातीचा किल्ला बांधून तयार करताना, त्या अत्युच्च आनंदाच्या क्षणी तुम्ही त्यांना बघितलं असणार. आपल्याला नेहमीच प्रश्न पडतो की इतक्या छोट्या गोष्टींमधून त्यांना इतका मोठा आनंद कसा मिळतो? ही जीवन–शक्ती असते जी त्या मुलांना आनंदी आणि उत्स्फुर्त बनवते. जीवन–शक्ती ही चराचरात भरलेली आहे, आणि लहान मुलं त्यांच्यातल्या शुद्धता आणि निरागसपणामुळे, ती शक्ती जास्तीत जास्त शोषून घेतात. आपण जर जाणीवपूर्वक ही शक्ती आपल्यात शोषून घेत राहिलो, तर लहान मुलांसारखं आपणसुद्धा आनंदी आणि उत्साही राहू शकतो, जे अगदीच शक्य आहे!

कृष्णानंद गुरुजी एकदा म्हणाले होते, "आपण इथे फक्त अनुभव घ्यायला नाही आलो तर, प्रकटीकरणासाठीसुद्धा आलो आहोत." त्यांनी आम्हाला सांगितलं की, सर्व सर्जनशील गोष्टींच्या मागे जीवन–शक्ती आहे जसे की चित्रकला, संगीत, कविता, स्वप्नं किंवा दिवास्वप्नं इत्यादी. जीवन–शक्ती ही देवाने दिलेली भेट आहे आणि भौतिक विश्वाची खासियत आहे. ती सर्वत्र आहे. ती निसर्गात आहे. आपण जर काही वेळ निसर्गाच्या सान्निध्यात घालवला, तर आपल्याला इतकं ताजंतवानं वाटतं जणू काही आपला पुनर्जन्मच झाला आहे. त्यांनी आम्हाला हे देखील सांगितलं की, आपल्याला जर जाणीवपूर्वक जीवन–शक्ती शोषून घ्यायची असेल तर, आपण आकाशाकडे बघावे. आकाशाकडे नुसतं बघूनसुद्धा आपण ही अदृश्य शक्ती भरपूर मिळवू शकतो.

इतक्यातच, मी बीबीसी वाहिनीवर बातम्या बघत होतो. त्यात ते पॅलेस्टाईनच्या निर्वासितांचं शिबीर दाखवत होते. सहाजिकच, ते बघणं हा सुखद अनुभव नव्हता. त्या तात्पुरत्या बांधलेल्या निवासांवरती मला दोन पतंग एकमेकांचा मांजा कापतांना दिसले आणि मला थोडं विचित्र वाटलं. पतंग उडत होते म्हणजे नक्कीच तिथे लहान मुले होती. मला आश्चर्य वाटलं की इतक्या आपत्तीजनक परिस्थितीमध्येसुद्धा ह्या मुलांमध्ये आयुष्य साजरं करण्यासाठी, किती उत्साह भरलेला होता. मी आणखी एका घटनेचा विचार करतो, जेव्हा तामिळनाडूमध्ये सुनामी येऊन सगळी घरं वाहून गेली होती. बातमीत दाखवत होते त्याप्रमाणे, एक छोटी खोली जिचं दार तुटलं आहे आणि दाराची चौकट फक्त उरली आहे, एक स्त्री त्या दरवाज्यासमोर सडा सारवणं करून रांगोळीने सजवत होती. हीच जीवन–शक्ती आहे. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात कठीण परिस्थिती येऊ शकते, जेव्हा आपल्याला वाटते की जगाचा अंत जवळ आला आहे. सगळं संपलं आहे. तेव्हा जीवन–शक्ती आपल्या आशा पल्लवित करते. तिच्या अनुपस्थितीत आपली आयुष्यं निरस आणि कंटाळवाणी होतील. हे म्हणजे असं झालं की, काळजीशिवाय प्रेम, चांदण्यांशिवाय चन्द्र आणि सुवासाशिवाय फुलं असणे.

जेव्हा जेव्हा आपल्याला जीवन–शक्तीचा अभाव जाणवतो, आपण आयुष्याचा विशाल दृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. कदाचित, आपल्याला परत एकदा मूल होता आलं पाहिजे किंवा स्वत:मध्ये मुलांसारखी निरागसता आणता आली पाहिजे, जशी आपल्या गुरुजींमध्ये होती. ते असेही म्हणायचे की, देवाच्या राज्यात जायचं असेल, तर आपल्याला लहान मुलांसारख व्हावं लागेल. मला वाटतं, जेव्हा आपलं आश्चर्यचकित होणं थांबतं, संगीत, सूर्यास्त आणि रात्रीचं तारांगण ह्यातून आनंद मिळायचा थांबतो, त्याचा अर्थ आपल्यातील जीवन–शक्ती कमी झाली आहे. आपण जीवन–शक्तीचे दमन न करता, तिला जास्तीत जास्त प्रकट होऊ दिले पाहिजे.

जेव्हा आपण प्रकाशाच्या महासागराशी जोडले जाऊन प्रकाश प्रवहन करतो, तेव्हा आपल्याला सर्वात जास्त जीवन–शक्ती मिळते. आपण प्रकाश प्रवहन करूया आणि आपली आयुष्यं अधिक आनंदी, कृपेने समृद्ध आणि हेतूपूर्ण बनवूया. ■

## शाळांना आवाहन

जागतिक प्रकाश प्रवहन चळवळीला सशक्त करण्यासाठी, सकाळच्या प्रार्थनेच्या आधी किंवा पहिल्या तासाच्या आधी, ३ ते ७ मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव करावा.

## शाळांमधील प्रकाश प्रवहन


| | |
|---|---|
| सहभागी शाळा | : ६१७५ |
| प्रकाश प्रवहन केलेले विद्यार्थी | : ३०.९८ लाख |
| नियमित प्रकाश प्रवहन करणाऱ्या शाळा | : : ५०८ |
| नियमित प्रकाश प्रवहन करणारे विद्यार्थी | : २.२१ लाख |


हे मासिकपत्र, कुटुंब सदस्य आणि मित्रांमध्ये कृपया पोहोचवावे. ह्या वृत्तपत्राची नि:शुल्क पीडीएफ आवृत्ती आमच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल.
www.lightchannels.com

नियमित प्रकाश प्रवहनाचा लाखो लोकांना फायदा झाला आहे. अनेकांना कल्पनातीत मदत मिळाली आहे आणि सुंदर अनुभव आले आहेत. तुमचा अनुभव दुसऱ्यांना प्रेरणा देऊ शकतो आणि मार्गदर्शक ठरू शकतो. कृपया आपला अनुभव आम्हाला कळवा.
info@lightagemasters.com

अनेक मुलं, शिक्षक आणि स्वयंसेवकांचे अनुभव "Experiences of Light Channels" ह्या पुस्तकात संकलित केले आहेत. पहिला खंड प्रकाशित झाल्यावर अनेकांनी त्यांचे अनुभव आम्हांला सांगितले, म्हणून दुसरा खंड प्रकाशित केला. तुम्हाला हे दोन्ही खंड आमच्या संकेतस्थळावरून नि:शुल्क डाऊनलोड करता येतील.
www.lightchannels.com






# प्रकाश प्रवहनाचे अनुभव

(संकलन : वैशाली जोशी, अनुवाद : प्रतिभा ओक, पद्मजा बाजपेयी)

श्री गुरुविद्या समस्थे, शिवपुरा येथील एका शिक्षिकेने त्यांचा अनुभव सांगितला. त्यांचे पती खूप रागीट होते, त्यांचे ऐकत नव्हते आणि त्यांना उच्च रक्तदाब होता. त्यांचा रक्तदाब २००च्या वर असायचा. त्यांनी आपल्या पतीला प्रकाश प्रवहन शिकवले. आता त्यांचा रक्तदाब नियंत्रित आहे व आता ते घरातील सदस्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतात.

त्यांना स्वतःला तीव्र शिरःशूल होता. त्या वेदना असह्य होत्या म्हणून त्यांनी एम आर आय स्कॅनिंग केले. डॉक्टरांनी मानसिक ताणामुळे त्यांना हा त्रास होत आहे असे सांगितले. त्यांनी नियमितपणे दररोज दहा मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव सुरू केला. आता त्यांना डोकेदुखीचा त्रास नाही. त्यांनी दररोज नियमितपणे दहा मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव करणे सुरू ठेवले आहे व त्या त्यांच्या मुलांना पण प्रकाश प्रवहन करण्यासाठी आग्रह करतात.

– चंद्रकला डी., एक प्रकाश प्रवहन स्वयंसेवक

मागील दीड वर्षापासून मी प्रकाश प्रवहनाचा सराव करत आहे. ऑगस्ट २०२२ पासून माझी फुफ्फुसाच्या कर्करोगासाठी चिकित्सा सुरू आहे. दोन वेळा फुफ्फुसाची शस्त्रक्रिया व त्यानंतर किमोथेरपी ई. झाले आहे. प्रकाश प्रवहनाने या अवघड काळात अशा शारीरिक अवस्थेचा सामना करण्यासाठी माझे मन खंबीर ठेवण्यास मला खूप मदत केली आहे. मी नियमितपणे सकाळी आणि संध्याकाळी प्रकाश प्रवहन करत होते आणि सतत प्रकाशाच्या जाणिवेमध्ये राहत होते. यामुळे रोजच्या आयुष्याच्या अनुभवांमध्ये मी खूप सकारात्मक झाली आहे. निःसंशयपणे आता माझे मन शांत राहते. मी माझ्या छातीकडे प्रकाश प्रवाहित करू शकते आहे. सुरुवातीला मला ते अवघड जात होते पण आता मी आरामात प्रकाश पसरवू शकते आहे. मी आता एका वेगळ्या संवेदनांचा अनुभव घेते आहे, जो मी शब्दात सांगू शकत नाही. आधी माझे विचार विस्कळीत होते आणि माझे मन भरकटत रहायचे; आता तसे नाही. माझा राग सुद्धा कमी झाला आहे. प्रकाश प्रवहनाने मला शांतीमय व्यक्तीमध्ये बदलण्यास मदत केली आहे. प्रकाश प्रवहनाद्वारे दिलेल्या आशीर्वादासाठी मी इश्वराला मनापासून धन्यवाद देते.

– श्रीमती सुधा इंदिराबाई, एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहन करण्यापूर्वी मी माझ्या आत्मग्लानीमध्ये गुरफटले होते. या स्थितीतून मी आता वेगाने बाहेर पडत आहे. मी प्रत्येकाला सल्ला देत राहायचे. मला वाटायचे की मी मदत करत आहे. पण जर लोकांनी माझा सल्ला ऐकला नाही तर मला राग येत असे आणि वाईट वाटत असे. आता मला असे वाटते की देव त्यांचे नक्कीच संरक्षण करेल आणि त्यांना मदत करेल. मी प्रत्येकाला सल्ला देणे कमी केले आहे. पूर्वी मी कोणाचीतरी किंवा कोणत्याही गोष्टीबद्दल तक्रार करत असे पण आता मला कळले आहे की सगळं काही देवाच्या इच्छेमुळे घडते. मी हे स्वीकारले आहे आणि मला आता काही अंशी शांत वाटतं आहे. मी नेहमी भूतकाळ आणि भविष्याचा विचार करत असे म्हणून माझे मन नेहमीच जड असे. आता मी नेहमीच वर्तमानातील क्षणांमध्ये राहण्याचा प्रयत्न करत आहे. मी माझ्या मनात हलकेपणाचा अनुभव घेत आहे आणि मी हसण्यासाठी सक्षम आहे. माझी आत्मजागृती वाढली आहे. जेव्हा जेव्हा मला जाणीव होते, तेव्हा मी स्वतःला प्रकाशाने भरून घेते आणि पूर्ण जगापर्यंत प्रकाश प्रवहन करते. या काळात माझ्यात एक अपार शांतता आणि समाधान पसरते. मी सतत माझ्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करते आहे. मला अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठीसुद्धा कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटते. यामुळे मला खूप आनंद मिळत आहे. मी मनःपूर्वक गुरुजी, सप्तऋषी आणि देवाचे आभार मानते.

– श्रीमती उमादेवी, एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहन अद्भुत आहे. मी दररोज त्याचा सराव करण्याची वाट पहात असते. याचा सराव मी गेले दीड वर्षे करत आहे. प्रकाश प्रवहन करण्यापूर्वी आपण पुष्टी केलेली वैश्विक सत्यवचने खूप उपयुक्त आहेत. हे मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. माझ्या मनात आणि आमच्या घरातही खूपच शांतता आहे. आता जेव्हा मी कठीण परिस्थितीतून जाते तेव्हा मला कोणत्याही बाहेरच्या व्यक्तीच्या सल्ल्याची आवश्यकता वाटत नाही. मला माहिती आहे की देव काळजी घेतो आणि मी त्याच्या दैवी चरणी शरणागत होते. हे तंत्र आम्हाला उपलब्ध करून दिल्याबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. या दैवी सेवेत सहभागी असलेल्यांच्या कल्याणासाठी मी प्रार्थना करते.

– श्रीमती सेल्वम, एक प्रकाश प्रवाहक

प्रकाश प्रवहन हे मराठी द्वै–मासिक असून, त्याचे वितरण हे खाजगी आहे. मानसा फाउंडेशन (र) तर्फे प्रकाशन, मुद्रण आणि संपादकीय काम हे जयंत देशपांडे बघतात. प्रकाशन मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर– बागलूर रोड), बंगलोर – ५६००७७, येथून आणि मुद्रण मे. लोटस प्रिंटर्स प्रा. लि., फोन २३३८०१६७/२३२०९९०९, ईमेल lotus.creation777@gmail.com, website: www.lotusprinters.com, मालकी हक्क: मानसा फाउंडेशन (र), तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर– बागलूर रोड), बंगलोर ५६००७७ संपादक: जयंत देशपांडे